# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

३ मार्च, २०१९


☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)


# चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक ०२/०३/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, बल्लारशाह, भद्रावती, सिंदेवाही, पाथरी, राजुरा, कोरपना, टेकामांडवा, गडचांदुर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **१७** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०३ आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयात एकुण **३,६९,४००/–रू.** चा मुदद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

———————————————————————————————————————

☎ : 07172-264300
📠: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
✍: 7276494810 (PRO)

# नवनिर्मित सावली पोलीस स्टेशन प्रशासकीय इमारतीचा उद्घाटन सोहळा थाटात संपन्न.

दि. ०२ मार्च २०१९ रोजी चंद्रपुर जिल्हयातील आणखी एक नवनिर्मीत पोलीस स्टेशन सावली प्रशासकीय इमारतीचा उद्घाटन सोहळा मा. ना. श्री. सुधिर मुनगंटीवार, मंत्री वित, नियोजन व वने, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, चंद्रपुर यांचे शुभ हस्ते थाटात पार पडला.

पोलीस स्टेशन सावली उभारल्या गेलेल्या या नवनिर्मीत पोलीस स्टेशनची इमारत ही अत्याधुनिक सोई सुविधेने सुसज्ज असुन पोलीस स्टेशनमध्ये व्हिजीटर मॅनेजमेंट सिस्टीम लावण्यात आलेली आहे. पोलीस स्टेशन इमारतीमध्ये सुचनादर्शक बोर्ड, जनजागृती विषयक माहिती सुध्दा लावण्यात आलेली आहे. सदर कार्यक्रमाचे उदघाटक तथा अध्यक्ष म्हणुन वित्त नियोजन व वने मंत्री महाराष्ट्र राज्य तथा चंद्रपुर जिल्हयाचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार हे असुन सदर कार्यक्रमात उद्घाटक म्हणुन मनोगत व्यक्त करतांना त्यांनी जिल्हयातील पोलीस दलाला महाराष्ट्रातील उत्तम पोलीस दल म्हणुन सिध्द करण्याचे तसेच मिशन शक्ती मध्ये पोलीस दलाचा ठसा उमटावा व जिल्हयाचे नावलौकीक वाढावे असे आवाहन उपस्थित पोलीस दलाला केले.

कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणुन श्री. देवराव भोंगळे, अध्यक्ष, जिल्हा परिषद चंद्रपुर, खासदार श्री. अशोक नेते गडचिरोली–चिमुर लोकसभा क्षेत्र, माजी आमदार श्री. अतुल देशकर, पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी, परि. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉवत, उपविभागीय पोलीस अधिकारी राजुरा श्री. शेखर देशमुख, परि. पोलीस उपअधीक्षक श्री. अमोल मांडवे, जि.प. बांधकाम सभापती श्री. तंगडपल्लीवार, सावली नगराध्यक्ष, बांधकामविभागाचे अधिकारी, पोलीस निरिक्षक सावली श्री. स्वप्नील धुळे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्तावीक पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी यांनी केले असुन त्यांनी आपल्या प्रास्ताविकामध्येच संपुर्ण चंद्रपुर पोलीस दल हे भविष्यकाळात स्मार्ट पोलीस स्टेशन प्रमानेच स्मार्ट वर्क करेल असे उपस्थितांना आश्वासन दिले. कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन पोउपनि. श्री. विकास मुंढे यांनी केले असुन कार्यक्रमादरम्यान ग्रामस्थांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती. उपस्थितांसाठी पोलीस स्टेशन सावली तर्फे अल्पोहाराची व्यवस्था सुध्दा करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन पोलीस निरिक्षक सावली श्री. स्वप्नील धुळे आणि सावली पोलीस स्टेशन कर्मचारी वृंद यांनी केले.

---